# जिल्हा परिषद अमरावती

**आदेश-**

क्रमांक जिप/मुकाअ/स्विस/ ११८ /१६
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक - १५ सप्टेबर, २०१६

वाचा - मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्रमांक -
आकाअ/म.शा.4/कावि799/2016 दिनांक 31 ऑगस्ट 2016.

ज्याअर्थी, संदर्भीय आदेशानुसार उपायुक्त महसूल, अमरावती विभाग अमरावती यांचे देखरेखाली **विशेष संनियंत्रण कक्ष** स्थापन करण्यात आलेला असून सदर कक्षामार्फत विभागीय आयुक्त कार्यालयाशी इतर विभागांकडून सनियंत्रण करावयाच्याबाबी परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेकडील विषयांशी संबंधित प्रकरणांचा पाठपुरावा करणेसाठी समन्वय अधिकारी यांची नेमणुक करण्याचे निर्देशित आहे.

त्याअर्थी, जिल्हा परिषद अमरावतीकडील प्रकरणांच्या सनियंत्रणासाठी श्री. संजय राठी, कनिष्ट प्रशासन अधिकारी (कक्ष प्रमुख माहिती व तंत्रज्ञान कक्ष) यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. श्री. संजय राठी यांनी परिशिष्ट 'अ' प्रमाणे सर्व विभागांशी समन्वय ठेवून आवश्यक ती माहिती विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावी.

(डॉ.किरण कुलकर्णी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

प्रत §

१. मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांना संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव सादर.
२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.

COMM/AMT/RLV/MS 4/COMPU2/OTHER/6/2016

# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित कार्यालय**

बायपास रोड, कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२

*दूरध्वनी ०७२१-२६६२०३४/२५५२९२३ फॅक्स ०७२१-२६६२७८२*

ईमेल : amravati_divcom@rediffmail.com **वेबसाईट** : http://amravatidivision.gov.in

क्रमांक : आकाअ/म.शा.४/कावि- /२०१६ दि. : ऑगस्ट, २०१६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व विभाग/कार्यालय प्रमुख)
अमरावती

विषय : विशेष सनियंत्रण कक्ष
विभागाची/कार्यालयाची शासनाने विहीत करुन दिलेल्या प्रपत्रांमध्ये अद्यावत माहिती तात्काळ सादर करणेबाबत.

मा.मुख्यमंत्री यांचे पथदर्शी कार्यक्रम, महत्वाची फल निष्पत्ती क्षेत्र (KRA) तसेच मा.विभागीय आयुक्त यांचे प्राधान्याच्या विषयांचे सनियंत्रण व पाठपुरावा करण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांचे आदेश क्रमांक आकाअ/म.शा.४/७९२/२०१६ दिनांक २६.०८.२०१६ द्वारे उपायुक्त (महसूल) यांचे देखरेखीखाली **विशेष सनियंत्रण कक्ष** स्थापन करण्यात आला आहे. तसेच या सनियंत्रण कक्षाचे कामकाजाचे दृष्टीने अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा अतिरिक्त स्वरुपात या कक्षामध्ये वर्ग करण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत सनियंत्रण कक्षाचे कामकाज दि.२९.०८.२०१६ पासून नियमितरित्या सुरु झाले आहे.

नियंत्रण कक्षामध्ये नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आलेले विषय सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये विषद करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने आपण आपल्या विभागाची/कार्यालयाची आवश्यक संपूर्ण तपशिलवार माहिती शासनाने विहीत करुन दिलेल्या प्रपत्रांमध्ये spcellamt@gmail.com व divcom.amravati@maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.३१.०८.२०१६ रोजीच्या स्थितीसह दि.०१.०९.२०१६ रोजी सादर करावी. सदर माहिती दररोज सायंकाळी ५ वाजता अद्यावत करुन उपरोक्त मेलवर न चुकता सादर करावी. याकरिता आपले कार्यालयातील एका समन्वय अधिकाऱ्याची नेमणूक करावी. नेमलेल्या अधिकाऱ्याचे नांव, पदनाम व संपर्क क्रमांक या कार्यालयाला दि.०१.०९.२०१६ रोजी कळवावा. ई-मेल केल्याबाबत संबंधीत अधिकाऱ्याने दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२०६२ वर विशेष सनियंत्रण कक्षाला कळवावे.

या शाखेमार्फत आपणाकडे येणाऱ्या ई-मेल व संपर्काला विशेष प्राधान्य देण्यात येऊन तात्काळ माहिती सादर करण्यात यावी.

*सहपत्र : उपरोक्त नमुद परिशिष्ट-अ*

(जे.पी.गुप्ता)
विभागीय आयुक्त,
अमरावती.